# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक:- ८२-२३** **दिनांक:- ११/०३/२०२३**

## वाहन व मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन ०९ गुन्हे उघडकीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विशेषत: वसई-विरार परिसरात वाहन व मोबाईल चोरीच्या गुन्हयात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर गुन्हयावर आळा घालण्याकरीता व घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

सदर सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. श्री. राहुल राख यांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करुन दिनांक १०/०३/२०२२ रोजी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे एक इसम सनसाईन कमर्शीयल कॉम्प्लेक्स समोर नालासोपारा पुर्व, आचोळे रोड येथे चोरीचे मोबाईल फोन विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा कारवाई करुन आरोपीत नामे गणेश अशोक पवार, वय २२ वर्ष, रा. कैलास नगर चाळ, कोकणी पाडा, लास्ट स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेवून त्याच्याकडून ०५ मोबाईल फोन हस्तगत केले.

तसेच एक इसम चोरीच्या मोटार सायकल विक्री करण्यासाठी काशिमिरा, घोडबंदर येथील रिलायन्स पावर हाउसचे पाठीमागे येणार असल्याचे खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा कारवाई करुन आरोपीत नामे कार्तीक प्रशात भुजे, वय २३ वर्षे, रा. लक्ष्मी निवास बिल्डींग, कोकणी पाडा, लास्ट स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई यास ताब्यात घेवुन त्याचेकडून ०३ मोटार सायकल व ०१ रिक्षा अशी एकूण ०४ वाहने हस्तगत करण्यात आली आहेत. नमूद आरोपीतांकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

### :- उघडकीस आलेले गुन्हे -:

| अ क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.न. ११२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ४५७ |
| २. | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.न. १२१७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ४५७ |
| ३. | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.न. ९१४/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३८० |
| ४. | विरार पोलीस ठाणे. | गु.र.न. ७६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ५. | तुळींज पोलीस ठाणे. | गु.र.न. १२८५/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ६. | तुळींज पोलीस ठाणे. | गु.र.न. ५५०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ७. | बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.न. १८६१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ८. | दहिसर पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.न. २६१/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| ९. | खार पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.न. १३०/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ |

वर नमूद आरोपीतांचा गुन्हे अभिलेख तपासून पाहिला असता नमूद आरोपी हे अभिलेखावरील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**अटक आरोपी गणेश अशोक पवार याचेविरुध्द यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१) दहिसर पोलीस ठाणे, मुंबई गु.र.नं. ९५/२०२० भा.द.वि.सं. कलम ३९२,३४
२) एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे,मुंबई भा.द.वि.सं. २०/२००० भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे

**अटक आरोपी कार्तीक प्रशात भुजे याचेविरुध्द यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१) भिवंडी तालुका पोलीस ठाणे, गु.र.नं. ११९९/२०१४ भा.द.वि.सं. कलम ३९४,३४
२) एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.नं. २०/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३९२,३४
३) दहिसर पोलीस ठाणे, मुंबई, गु.र.नं. ३३६/२२ एन.डी.पी.एस. ॲक्ट ८ (सी), २७
४) दहिसर पोलीस ठाणे, मुंबई, गु.र.नं. १५१/२१ म.पो.ॲक्ट १२२ (ब) प्रमाणे

सदरची कामगिरी श्री. अविनाश आंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि.श्री.राहुल राख, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा. अनिल नागरे, जयकुमार राठोड, शिवाजी पाटील, राजाराम काळे, गोविंद केंन्द्रे, प्रविणराज पवार, राजबिर संधु, हनुमंत सुर्यवंशी यांनी केलेली आहे.



------ oooo ------